N.C.R.B (एन.सी.आर.बी)
I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

# FIRST INFORMATION REPORT
**(Under Section 154 Cr.P.C.)**
प्रथम खबर अहवाल
**(कलम १५४ फौजदारी प्रक्रिया संहिता)**

1. **District (जिल्हा):** ठाणे शहर **P.S.(ठाणे):** नौपाडा
**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0269 **Year (वर्ष):** 2023
**Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):** 15/09/2023 01:32

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**
1. **Day(दिवस):** गुरूवार **Date From (दिनांक पासून):** 14/09/2023
**Time Period (कालावधी):** पहर 6 **Date To ( दिनांक पर्यंत):** 14/09/2023
**Time From (वेळेपासून):** 16:59 बजे
**Time To (वेळेपर्यंत):** 16:59 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**
**Date (दिनांक ):** 15/09/2023 **Time (वेळ):** 01:17 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**
**Entry No. (नोंद क्र.):** 003
**Date & Time (दिनांक आणि वेळ):** 15/09/2023 01:17 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी
5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**
1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**
उत्तर, 3 किमी **Beat No. (बिट क्र.):**
(b) **Address (पत्ता):** महाराष्ट्र जीवनप्राधिकरण ,विभागाचे कार्यालयात ,ठाणे

(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**
**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**
**District(State) (जिल्हा(राज्य)):**

6. **Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):**

(a) **Name (नाव):** आकाश दिलीप गुप्ता

(b) **Father's/Husband's Name(वडील / पती चे नाव) :**

(c) **Date/Year of Birth (जन्म तारीख/वर्ष):** 1996

(d) **Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत

(e) **UID No. (यु.आय.डी. क्र.):**

(f) **Passport No.(पारपत्र क्र.):**

**Date of Issue (दिल्याची तारीख):**

**Place of Issue (दिल्याचे ठिकाण):**

(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN) ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )**

| S.No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address (पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | ई/110,गालानगर,रयल जिवदानी अपार्टमेंट,नालासोपारा पूर्व ,ठाणे ग्रामीण , महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | ई/110,गालानगर,रयल जिवदानी अपार्टमेंट,नालासोपारा पूर्व ,ठाणे ग्रामीण , महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation (व्यवसाय):**

(j) **Phone number (फोन नं.):**

**Mobile (मोबाइल नं.):** 91-8793951838

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | श्रीपत गोपाळ खाडे | | वडील का नाम : गोपाळ खाडे | 1. 522,परांजपेनगर, चेरपोली, तळमजला, गोपाळ भवन, शहापूर, जि ठाणे ,शहापूर ,ठाणे ग्रामीण ,महाराष्ट्र,भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):**

9. **Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):**

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|
| 1 | नाणे आणि चलन | भारतीय- रुपया | 5,000/ रू | 5,000.00 |

10 **Total value of property (In Rs/-)**
**(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):**

5,000.00

11.**Inquest Report / U.D. case No., if any**
**(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

12.**First Information contents (प्रथम खबर हकीकत ):**

फिर्याद दिनांक 15/09/2023

मी, आकाश दिलीप गुप्ता, वय 27 वर्षे राहणार ई/110, रॉयल जिवदानी अपार्टमेंट, गालानगर, नालासोपारा पूर्व असा असून,

मी जन्मापासुन सदरच्या पत्त्यावर आपले कुटुंबासमवेत राहत आहे. मी सन 2019 मध्ये बी.ई.मेकॅनिकलचे शिक्षण घेतले असून सध्या व्ही.जे.टी.आय येथे एम.टेक.च्या द्वितीय वर्षात शिकत आहे. मी शासनाच्या बेरोजगार अभियंता ठेकेदार नोंदणी योजनेच्या अंतर्गत कंत्राटदार नोंदणी करण्याकरीता महाराष्ट्र जीवन प्राधिकरण कार्यालय ठाणे येथे दिनांक 19/12/2022 रोजी अर्ज केला होता. त्यावेळी अर्जासोबत मी नियमाप्रमाणे रु 5,000/- रकमेचा डिमांड ड्राफट दिला. सदरचा अर्ज महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, ठाणे येथील कर्मचारी श्री श्रीपत खाडे यांचेकडे दिला. सदरचा डी डी त्यांनी हरविला असल्याचे सांगितले. त्यामुळे मी दिनांक 23/12/2022 रोजी त्यांना नविन डी डी काढून दिला.

त्यानंतर मी वारंवार श्री खाडे यांचेशी मो.क्रं.8888615722 वर प्रत्यक्ष जावून संपर्क करीत होतो. ते वेळोवेळी मला इतर कामात व्यस्त असल्याचे सांगून टाळाटाळ करीत होते.

अशाप्रकारे श्री खाडे यांनी विलंब केल्यामुळे माझे दुसरे डी डी चा देखील 3 महिन्याचा कालावधी पुर्ण झाल्याने तो रदद झाला. त्यानंतर मी पुन्हा श्री खाडे यांना भेटलो व त्याचे मागणी वरुन मी त्यांना पुन्हा नवीन डी डी काढून दिला. त्यानंतर देखील मी माझे कामाचा वेळोवेळी पाठपुरावा करीत होतो. त्यानंतर श्री. श्रीपत खाडे यांनी मला सदरचा डी डी चालणार नसून त्याचेवरील म.ज.प. हे नाव वगळून Executive Engineer MJP Division Thane असे नाव बदलून आणण्यास सांगितले आहे. मी माझे कंत्राटदार नोंदणीचे कामाकरीता श्रीपत खाडे यांना लाच देत नसल्याने ते माझी फाईल पुटअप करण्यास टाळाटाळ करीत असल्याची माझी खात्री झाली त्यामुळे मी दिनांक 09/08/2023 रोजी लाचलुचपत प्रतिबंधक विभागाचे व पोलीस विभागाचे पोर्टलवर ऑनलाईन तक्रार केली.

सदर तक्रारीचे अनुषंगाने पोउपअधी. श्री. जॉन यांनी माझे मोबाईल क्रमांकावर संपर्क साधुन मला दि. 17/08/2023 रोजी अँन्टी करप्शन ब्युरो, ठाणे कार्यालयात बोलविले. त्यानंतर पोउपअधी. श्री. जॉन यांनी मी, दिलेल्या तक्रारीची दोन शासकीय पंचासमक्ष पडताळणी करण्यात येणार असुन पडताळणी दरम्यान लाचेची रक्कमेची मागणी झालेनंतर लाचेचा सापळा आयोजित करणार असल्याची माहीती मला दिली. त्याप्रमाणे दि. 17/8/2023 रोजी अँन्टी करप्शन ब्युरो ठाणे कार्यालयात माझे व पंचाचे वक्तव्य घेतले व पोउपअधी. श्री. जॉन यांनी आम्हा सर्वांना योग्य त्या सुचना दिलेनंतर, मला डिजीटल व्हाईस रेकॉर्डर लावुन पंच श्री. गांगोडा यांचे समवेत महाराष्ट्र जीवन प्राधिकरण विभाग ठाणे कार्यालयात येथे रवाना करण्यात आले. सदर पडताळणी दरम्यान लोकसेवक खाडे यांनी मला सोमवारी त्यांचे बेरोजगार अभियंता ठेकेदार नोंदणीचे काम होण्याची शक्यता असल्याचे सांगून ते सोमवारी मला फोन करतील असे सांगितले. त्यामुळे त्यावेळी लोकसेवक श्री. खाडे हे माझेकडे लाचेची मागणी करण्याची शक्यता निर्माण झाली.

त्यामुळे दिनांक 21/8/2023 रोजी पुन्हा पंचासमक्ष केलेल्या पडताळणी मध्ये माझे मो.क्रं. 8793951838 वरुन लोकसेवक श्रीपद खाडे यांचे मो.क्रं.8888615722 वर पंचासमक्ष फोन करुन स्पिकर फोन ऑन केला. त्यावेळी मी लोकसेवक खाडे यांना माझे काम झाले काय? असे विचारले असता लोकसेवक खाडे यांनी सर्कल

ऑफीस येथे आलो असल्याचे सांगून तेथील दुसरे लोकसेवक यांना फोन दिला. सदर लोकसेवकाने आपले नाव उंबरमाळे असे सांगून त्यांना नुकतीच माझी फाईल मिळाली असल्याचे सांगितले व तीन/चार दिवसांत काम होईल असे सांगितले. त्यामुळे लोकसेवक खाडे यांचा मला फोन आलेनंतर पुढील कार्यवाही करण्याचे निश्चित केले. परंतु मला लोकसेवक खाडे यांचा फोन न आल्याने दिनांक 24/08/2023 रोजी पुन्हा नव्याने पडताळणी करण्यात आली. त्यावेळी माझी व लोकसेवक श्री खाडे यांचेशी प्रत्यक्ष भेट झाली नाही, परंतु, त्यांचेत मोबाईल फोन द्वारे झालेल्या संभाषणा दरम्यान लोकसेवक खाडे यांनी त्यांचे वरिष्ठ अधिकारी कामानिमीत्त बाहेर असल्याने त्यांचे फाईलवर सही झाले नसल्याचे सांगून दुसरे दिवशी दिनांक 25/08/2023 रोजी साहेबांची सही होणार व त्यानंतर फाईल त्यांचेकडे येणार असल्याचे सांगून मला तीन वाजता फोन करण्यास सांगितले. त्यामुळे दुसरे दिवशी दि. 25/8/23 रोजी पुन्हा नव्याने केलेल्या पडताळणी करण्यात येवुन सदर पडताळणी दरम्यान लोकसेवक खाडे यांनी माझे फाईलवर अदयाप सही झाले नसल्याचे सांगून मला सोमवारी येण्यास सांगितले. त्यामुळे वारंवार पडताळणी करण्यापेक्षा काही दिवस वाट पाहून माझे प्रलंबित काम पूर्ण झालेबाबत लोकसेवक श्री. खाडे स्वतः मला फोन करतात अगर कसे हे पाहून पुढील पडताळणी/सापळा कारवाई आयोजित करण्यात येणार असल्याचे निश्चित केले होते.परंतु लोकसेवक खाडे यांचा फोन न आल्याने मी काल दिनांक 13/09/2023 रोजी महाराष्ट्र जीवन प्राधिकरण कार्यालयातील वरिष्ठ कार्यकारी अभियंता श्री. तन्मय कांबळे यांना फोन केला असता श्री. कांबळे यांनी त्यांना आज दिनांक 14/09/2023 वा. सकाळी येवुन भेटण्यास सांगितले आहे व त्यावेळी लोकसेवक खाडे यांना देखील ते बोलवणार असल्याचे मला सांगितल्याने आज रोजी पुन्हा पडताळणी कारवाई करण्यात येणार असल्याचे पोउपअधी श्री जॉन यांनी सांगितले.

त्यानंतर पोउपअधी. श्री. जॉन यांचे सुचनेप्रमाणे मला डिजीटल व्हॉईस रेकॉर्डर पंच श्री गांगोडा यांचेसोबत लोकसेवक श्री. खाडे यांचे वरिष्ठ अधिकारी श्री. तन्मय कांबळे कार्यकारी अभियंता यांची भेट घेण्यासाठी पाठविण्यात आले. मी व पंच श्री गांगोडा असे रिक्षाने महाराष्ट्र जिवन प्राधिकरणाचे गडकरी रंगायतनाजवळील कार्यालयात गेल्यावर तेथे कार्यकारी अभियंता श्री तन्मय कांबळे साहेबांना भेटलो त्यावेळी त्यांनी मला माझे कामाबाबत विचारणा करुन माझे काम आजच्या आज करून देणेबाबत लोकसेवक श्री. खाडे यांना सुचना दिल्या. व मला कोपरी येथील त्यांचे सर्कल कार्यालयातुन प्रस्ताव मंजुरीचे पत्र घेवुन येण्यास सांगितले. त्याप्रमाणे मी पंच श्री. गांगोडा यांचे सोबत कोपरी येथील सर्कल कार्यालयातुन प्रस्ताव मंजुरीचे पत्र घेवुन मी अँन्टी करप्शन ब्युरो कार्यालयात आलो. त्यानंतर पोउपअधी. श्री. जॉन यांनी दिलेल्या सुचनेप्रमाणे पुन्हा डिजीटल व्हॉईस रेकॉर्डर लावुन लोकसेवक श्री. खाडे यांचेकडे पंच श्री. गांगोडा यांचेसोबत रवाना झालो.

सदरवेळी श्री. खाडे यांनी माझेकडुन प्रस्ताव मंजुरीचे पत्र घेवुन माझी सर्व माहिती ऑनलाईन भरून मला सुशिक्षित बेरोजगार अभियंता ठेकेदार वर्ग-ड चे नोंदणी प्रमाणपत्र दिले त्यावेळी मी खाडे यांना '' निघु मी?'' असे विचारले असता त्यांनी त्यांचे उजव्या हाताची तर्जनी अंगठयावर घासुन इशारा करत '' बाकीच...'' असे मला खुणावले, त्यावर मी त्यांना काय? असे विचारले असता खाडे यांनी मला '' बाकीच...जे आहे ते देवुन टाक..'' त्यावर मी पुन्हा 'अं?' असे बोलुन काहीच समजले नाही असे दर्शविले असता '' बाकीच...जे आहे ते देवुन टाक'' असे सांगितले व मला हाताची पाच बोटे दाखवुन '' पाच'' असे बोलुन माझे कडे पाच हजार रूपये लाचेची मागणी केली त्यावर मी त्यांना कामास उशीर झाल्याचे सांगितले असता त्यांनी '' डी.डी. च्या प्रॉब्लेममुळे उशीर झाला....'' असे सांगितले. त्यावर मी माझेकडे आता कॅश नसल्याचे सांगुन '' आप बोलो कुछ कम करो यार..'' असे बोललो असता त्यांनी '' कम....कम किया.......'' असे सांगितले त्यावर मी आता माझेकडे पैसे नसल्याचे सांगितले असता खाडे यांनी मला'' इधर है ना एटीएम निकाल लो.....नंबर लेलो जी पे कर......'' असे सांगितले किंवा '' नंबर देता हु जी पे कर.......'' असे बोलुन गुगल पे द्वारे लाचेची रक्कम देण्यास सांगितले. त्यावर मी माझे खात्यावर देखिल पैसे नसल्याचे सांगितले. तसेच माझे भावास देखील सांगावे लागेल असे सांगितले. त्यावर खाडे यांनी '' ठिक है........ आपकी मर्जी असे बोलुन दुस-या दिवशी त्यांची सुट्टी असल्याचे सांगितले. त्यानंतर झालेल्या चर्चेत मी त्यांना '' मै आता हू थोडी देर मै.'' असे बोलुन मी पंच श्री. गांगोडा यांच्यासह तेथुन निघुन आलो.

अशा प्रकारे लोकसेवक श्री. खाडे यांनी माझेकडे माझे सुशिक्षित बेरोजगार अभियंता कंत्राटदार नोंदणीचे कामाकरीता 5,000/- रू. लाचेची स्पष्ट मागणी करून ती स्विकारण्याचे मान्य केले. त्यानंतर मी व पंच असे अँन्टी करप्शन ब्युरो, ठाणे कार्यालयात परत आलो. त्यांनतर पोउपअधी. श्री. जॉन यांनी डिजीटल व्हाईस रेकॉर्डर वरील ध्वनिमुद्रीत झालेले संभाषण पंचासमक्ष एकले असता लोकसेवक श्री. खाडे यांनी माझेकडे माझे कामाकरीता 5,000 /- रू. मागणी केल्याचे स्पष्ट झाले.

तद्नंतर सापळा कारवाईसाठी वापरावयाची 5,000/-रू. लाचेची रक्कम मी हजर केल्यावर सदर 5,000/- रू. रक्कमेच्या 500/- रू. दराच्या एकुण 10 नोटांना पंचासमक्ष अँन्थ्रासीन पावडर लावुन योग्यत्या कायदेशिर

तजवीजीने सापळापूर्व कारवाई पुर्ण करून आयोजित केलेल्या सापळा कारवाई दरम्यान मी व पंच श्री. गांगोडा असे, लोकसेवक यांचे कार्यालयात गेलो. त्यावेळी मी माझेजवळील लाचेची रक्कम श्री. खाडे यांच्या समक्ष गेलो. त्यावेळी त्यांनी मला पुन्हा आपल्या उजव्या हाताची तर्जनी अंगठयाने घासुन इशारा केला असता मी माझे शर्टच्या खिशात ठेवलेली लाचेची रक्कम काढुन त्यांच्या समक्ष धरली असता श्री.खाडे यांनी सदरची रक्कम आपले उजव्या हाताने स्विकारून समोरील टेबलावर ठेवलेल्या कॅलेंडरच्या खाली ठेवुन दिली, व मला टेंडर असल्यास सांगण्याचे आश्वासन दिले.

त्यानंतर मी कार्यालयाचे बाहेर येवुन सापळा पथकास दिसेल अशा पध्दतीने लाचेची रक्कम स्विकारलेबाबत पुर्वनियोजीत इशारा केला. मी केलेला इशारा पाहुन पोउपअधी. श्री. जॉन, पंच श्री. तांबोळी व सापळा पथकाने येवुन लाचेच्या रक्कमेसह लोकसेवक श्री. खाडे यांना 16.59 वा. रंगेहाथ पकडले.

अशा प्रकारे यातील लोकसेवक श्री. श्रीपत गोपाळ खाडे, वय 52 वर्ष, नोकरी - वरिष्ठ लिपीक तथा अतिरीक्त कार्यभार सहाय्यक भांडारपाल, महाराष्ट्र जीवनप्राधिकरण कार्यालय, ठाणे राहणार - घर नं 522, तळमजला, गोपाळ भवन, परांजपेनगर, चेरपोली, शहापूर, जि. ठाणे यांनी माझेकडे दि. 14/09/2023 रोजी माझे सुशिक्षित बेरोजगार अभियंता कंत्राटदार नोंदणीचे काम करून देण्याकरीता 5,000/-रू. लाचेची मागणी करून माझेकडुन 5,000/- रू. लाच स्विकारली असता अँन्टी करप्शन ब्युरो, ठाणे कार्यालयातचे पो.उप.अधी. श्री. संजु जॉन यांनी व त्यांच्या सापळा पथकाने श्री. खाडे यांना 16.59 वा महाराष्ट्र जीवनप्राधिकरण ठाणे विभागाचे कार्यालयात रंगेहात पकडले आहे. म्हणुन माझी त्यांचेविरूध्द कायदेशीर फिर्याद आहे.

माझी वरील फिर्याद संगणकावर टंकलिखीत केली असुन तिची काढलेली प्रिंट मी वाचून पाहिली ती माझे सांगणेप्रमाणे बरोबर व खरी आहे.

समक्ष

हे लिहुन दिले

(संजु जॉन)
पोलीस उप अधीक्षक
अँन्टी करप्शन ब्युरो, ठाणे

(आकाश दिलीप गुप्ता)

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2. (**केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.**)**

**(1) Registered the case and took up the investigation:**
**(**प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले**):**

SANJAY NARAYAN DHUMAL(I (Inspector)) / **or (**किंवा**)**

**(2) Directed (Name of I.O.) (**तपास अधिका-याचे नाव**):**

**Rank (**पद**):** **No.(**क्र.**):**

**to take up the Investigation (**ला तपास करण्याचे अधिकार दिले**) or (**किंवा**)**

**(3) Refused investigation due to (**ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला**):**

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

**(4) Transferred to P.S.**
**(**गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव**):**

**District (**जिल्हा**):**

**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) **.**

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

**14 Signature/Thumb impression of the complainant / informant.**
**(**तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा**):**
Akash
15/9/23

**15. Date and time of dispatch to the court**
**(**न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ**):**

**Signature of Officer in charge, Police Station**
**(**ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी**)**

**Name (**नाव**):** SANJAY NARAYAN DI
**Rank(**पद**):** I (Inspector)
**No.(**सं.**):**

पोलीस ठाणे अंमलदार
नौपाडा पोलीस स्टेशन, ठाणे.
दिनांक:- / /२०२३